# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:01.09.2025** **वार:सोमवार**

---

1. विकसित राष्ट्रासाठी स्वदेशीचा आग्रह धरण्याचं 'मन की बात'मधून पंतप्रधानांचं आवाहन
2. भारत -चीन परस्पर सहकार्यामुळे मानवतेच्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त होईल-पंतप्रधानांचं प्रतिपादन.
3. राज्यात घरोघरी काल ज्येष्ठा कनिष्ठा गौरी अर्थात महालक्ष्मींचं उत्साहात आगमन आणि
4. साखर कारखान्यांचं अर्थकारण भक्कम करण्यासाठी ते वर्षभर चालू ठेवण्याचा तज्ज्ञांचा सल्ला

**पंतप्रधान-मन की बात**

भारतातल्या स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी व्होकल फॉर लोकल, आत्मनिर्भर भारत आणि विकसित भारत या मंत्रांसह प्रगती करावी लागेल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवरून 'मन की बात' या कार्यक्रमातून त्यांनी देशवासियांना पुन्हा एकदा स्वदेशीचा आग्रह धरण्याचं आवाहन केलं...

**आने वाले दिनों में बहुत सारे त्योहारों की रौनक होगी। इन त्योहारों में आपको स्वदेशी की बात कभी भी भूलनी नहीं है। उपहार वही जो भारत में बना हो, पहनावा वही जो भारत में बुना हो, सजावट वही जो भारत में बने सामान से हो, और भी ऐसा बहुत कुछ। एक ही मंत्र 'वोकल फॉर लोकल', एक ही रास्ता 'आत्मनिर्भर भारत', एक ही लक्ष्य 'विकसित भारत'।**

सणावारांच्या काळात स्वच्छता राखण्यावर भर देताना, स्वच्छता असेल तर सणउत्सवांचा आनंद द्विगुणित होत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. एक भारत श्रेष्ठ भारताची भावना देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. यामध्ये क्रीडा क्षेत्राची भूमिका मोठी आहे. यंदा प्रथमच काश्मीरमध्ये आयोजित खेलो इंडिया जल क्रीडा स्पर्धांविषयी त्यांनी चर्चा केली. यामध्ये देशभरातून 800 खेळाडू सहभागी झाल्याचं त्यांनी सांगितलं, शिवाय त्यामध्ये महिला खेळाडूंची संख्या लक्षणीय असल्याचं त्यांनी नमूद केलं.

गेल्या काही दिवसांत झालेल्या निसर्गाच्या प्रकोपाची चर्चा करताना, हा काळ संपूर्ण देशाची कसोटी पाहाणारा असल्याचं सांगून भूस्खलनाचा कहर झाल्याचं त्यांनी नमूद केलं. आपत्ती काळात स्थानिक तसंच सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर आणि प्रशासनानं झोकून देऊन काम केलं. सर्वांनीच मानवतेला अग्रक्रम दिल्याचं सांगत, बचाव कार्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याची माहिती मोदी यांनी दिली.

**पंतप्रधान- चीन राष्ट्राध्यक्ष भेट**

शांघाय सहकार्य संघटनेच्या आज होणाऱ्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष --शी जिनपिंग, यांच्यात काल द्विपक्षीय चर्चा झाली. दोन्ही देश हे परस्परांचे विरोधक नसून-उभय देशांच्या परस्पर विकासातील भागीदार आहेत. ही भागीदारी परस्पर मतभेदांमध्ये बदलू नये, अशी अपेक्षा दोन्ही नेत्यांनी या भेटीनंतर व्यक्त केली. दोन्ही देशांच्या सीमेवर शांतता राखणं दोन्ही देशांतील परस्पर संबंधांच्या सातत्यपूर्ण विकासासाठी गरजेचं असल्याचं पंतप्रधान यावेळी बोलताना म्हणाले. गेल्या वर्षी झालेल्या सैन्यमाघारीविषयी दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केलं; तसंच दीर्घकालीन हित लक्षात घेत, सीमा मुद्द्यावर निष्पक्ष, तार्किक आणि परस्पर स्वीकारार्ह उपायांवर सहमतीही व्यक्त केली. कैलाश मानसरोवर यात्रा आणि दोन्ही देशांदरम्यानच्या थेट हवाई वाहतुकीविषयी मोदी यांनी माहिती दिली, ते म्हणाले...

**सीमा पर डिस्इंगेजमेंट के बाद शांति और स्थिरता का माहौल बना हुआ है। हमारे स्पेशल रिप्रेजेंटेटिव्स के बीच बॉर्डर मैनेजमेंट के संबंध में सहमति बनी है। कैलाश मानसरोवर यात्रा फिर से शुरू हुई है। दोनों देशों के बीच डायरेक्ट फ्लाइट भी फिर से शुरू की जा रही है। हमारे सहयोग से दोनों देशों के 2.8 बिलियन लोगों के हित जुड़े हुए हैं। इससे पूरी मानवता के कल्याण का मार्ग भी प्रशस्त होगा।**

**गौरी**

गौराई आली सोन्या-मोत्याच्या पावलांनी असं म्हणत ज्येष्ठा कनिष्ठा गौरी अर्थात महालक्ष्मींचं काल राज्यात घरोघरी मोठ्या उत्साहात आगमन झालं. खड्याच्या गौरी, शाडू, माती अथवा पितळी मुखवट्याच्या गौरी, तेरड्याच्या गौरी-आकर्षक रांगोळी आणि फुलांच्या सजावटीसह घरोघरी विराजमान झाल्या. त्यांच्यासमोर धान्य, फळे, फराळ, डाळी आदी पदार्थांची आरास करण्यात आली. आज घरोघरी गौरीपूजन होईल. दरम्यान, पाच दिवसांच्या घरगुती गणपतींचं काल विसर्जन करण्यात आलं.

**साखर परिषद**

साखर कारखान्यांचं अर्थकारण भक्कम करायचं असेल तर त्यांची उत्पादकता वाढवली पाहिजे. यासाठी साखर कारखाने वर्षभर चालू राहाण्यासाठी प्रयत्नशील राहावं असा सल्ला सहकार आणि बँकिंग तज्ज्ञ सतीश मराठे यांनी दिला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील सहकार अध्यासनातर्फे आयोजित राज्यस्तरीय साखर परिषदेत, मराठे बोलत होते. साखर-उत्पादक किंवा इतर उपपदार्थ-उत्पादक न राहता साखर कारखान्यांचं रुपांतर कृषी प्रक्रिया केंद्रांमध्ये झालं पाहिजे असं सांगून ते म्हणाले....

**आज आवश्यकता अशी आहे की देशात सर्व ठिकाणी ॲग्रो प्रोसेसिंगला गती मिळाली तर ॲग्रीकल्चरल प्रोड्यूस शेल्फ लाईफ वाढेल हे आपल्याला वेअरहाऊसमध्ये स्टोअर करता येईल आणि वेअरहाऊस रिसिप्ट समोर शेतकऱ्याला इमिडिएट बँकांकडून पैसेही मिळेल आणि जेव्हा त्या प्रोड्यूसची गरज असेल आवश्यकता असेल तेव्हा मार्केटमध्ये आपण जर का रिलीज केला तर ज्याला इकॉनॉमिक टर्म्स मध्ये प्राइस डिस्कव्हरी म्हणतो किंमत आपल्याला अधिक चांगली मिळण्याची शक्यता असते त्या सगळ्या गोष्टी आपण साध्य करू शकू आज विद्यापीठात झालेल्या मुख्यतः शुगर इंडस्ट्रीच्या कॉन्टेक्स्टमध्ये बोलत असताना मी एक विचार सर्वांसमोर मांडला आहे.**

प्रचंड मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक असलेले साखर कारखाने अवघे दोन-तीन महिनेच चालतात. जगाच्या पाठीवर अशा स्वरूपाचा चालणारा कोणताही मोसमी उद्योग नसल्याचं निरीक्षण मराठे यांनी नोंदवलं.

**भटके विमुक्त-सोलापूर, सांगली, परभणी**

सोलापुरात जिल्हा नियोजन भवनात काल विमुक्त जाती भटक्या जमाती दिनानिमित्त पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावर्षीपासून 31 ऑगस्ट हा विमुक्त जाती भटक्या जमाती दिन म्हणून संपूर्ण राज्यात साजरा करण्याचा निर्णय शासनानं घेतला आहे. 38 विमुक्त आणि 14 भटक्या जमातींचा यामध्ये समावेश असून जवळपास 350 जाती यामध्ये समाविष्ट आहेत.

सातारा जिल्ह्यातल्या गोंदवले बुद्रुक इथे भटक्या आणि विमुक्त समाजाच्या संस्कृतीतील जीवनमूल्यं, परंपरा यांचं दर्शन घडविणाऱ्या सांस्कृतिक, शैक्षणिक माहितीपर उपक्रमाची पाहणी करून गोरे यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. सांगली जिल्ह्यातल्या 43 आश्रम शाळांमध्ये वेगवेगळ्या उपक्रमांनी मोठ्या उत्साहात हा दिवस काल साजरा करण्यात आला. परभणीतल्या गंगाखेड इथे आमदार डॉक्टर रत्नाकर गुट्टे यांच्या उपस्थितीत भटक्या विमुक्त जातीतील 60 लाभार्थ्यांना घरकुल मंजुरीच्या आदेशांचं वाटप करण्यात आलं.

**<u>मराठा</u>**

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळ उपसमितीनं या बाबतीत पुनर्विचार करण्यासाठी अधिक वेळ मागितला आहे. महाराष्ट्र सरकार आणि मराठा आरक्षण आंदोलकांमधील विरोध कालही कायम राहिला. दरम्यान, मुंबई पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना आझाद मैदानावर आणखी एक दिवस आंदोलन सुरू ठेवण्याची परवानगी दिली आहे.

**<u>ऊस गाळप</u>**

राज्यातील आगामी 2025-26 मधील हंगामात ऊस गाळप परवान्यासाठीचे ऑनलाइन अर्ज, साखर कारखान्यांनी आज एक सप्टेंबरपासून करायचे आहेत. अर्ज पाठविण्याची अंतिम तारीख 30 सप्टेंबर असून, विनापरवाना ऊस गाळप सुरू केल्यास कारवाई करण्याचा इशारा साखर आयुक्त सिद्धाराम सालीमठ यांनी परिपत्रकाद्वारे दिला आहे.

**<u>पीक पाहणी-परभणी</u>**

अतिवृष्टीमुळे परभणी जिल्ह्याच्या काही भागात शेत-पिकं आणि रस्त्यांचं नुकसान झालं आहे. जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांनी काल पुयनी-पालम रस्त्याला भेट देऊन या रस्त्याची सार्वजनिक बांधकाम विभागानं तात्काळ दुरुस्ती करावी असे निर्देश दिले. यावेळी त्यांनी पुयनी आणि पालम शिवारातील शेत पिकांच्या नुकसानाचीही पाहणी केली.

**<u>निवृत्ती</u>**

आकाशवाणी पुणे केंद्रामध्ये कार्यरत तंत्रज्ञ अजय चव्हाण 38 वर्षांच्या लक्षणीय सेवेनंतर काल सेवानिवृत्त झाले. चव्हाण यांनी आकाशवाणी सोलापुर केंद्रावरुन आपल्या सेवेला सुरुवात करुन विविध ठिकाणी कार्य केलं. अभियांत्रिकी संघटनेचे संघटन-सचिव म्हणूनही त्यांनी काम केलं होतं. नांदेड आकाशवाणी केंद्रावर कार्यरत असलेले वरिष्ठ तंत्रज्ञ राजेंद्र नारायणराव गंगाखेडकर हेही 36 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर काल सेवानिवृत्त झाले.

**<u>हॉकी आशिया</u>**

बि हारमध्ये झालेल्या आशिया चषक-पुरूष हॉकी स्पर्धेत, कालच्या सामन्यात भारतानं जपानवर मात केली. अत्यंत चुरशीच्या सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगनं दोन तर मनदीपनं एक गोल केला. आता भारतानं, सुपर चारमध्ये प्रवेश केला आहे.

**<u>निधन-प्रिया</u>**

अभिनेत्री प्रिया मराठे यांचं काल मुंबईत कर्करोगामुळे निधन झालं. त्या 38 वर्षांच्या होत्या. त्यांनी मराठी नाटकांसह अनेक हिंदी मराठी मालिकांमध्ये अभिनयाचा ठसा उमटवला होता. मुंबईत मीरा रोड इथे काल संध्याकाळी त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<u>हवामान</u>**

मराठवाडा आणि विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट-माथ्यांवरही मुसळधार पावसाची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.